# विपश्यना

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष २५५६, चैत्र पौर्णिमा, २५ एप्रिल २०१३, वर्ष २ अंक २

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहा: – http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**ये च खो सम्मदक्खाते, धम्मे धम्मानुवत्तिनो।**
**ते जना पारमेस्सन्ति, मच्चुधेय्यं सुदुत्तरं॥**

*धम्मपद- ८६, पण्डितवग्गो*

जे लोक सम्यक प्रकाराने आख्यात धर्माचे अनुवर्तन करतात, ते अति कठीण मृत्यू-क्षेत्राच्या पार जातील.

## भगवानांची अपार करुणा

भगवानांच्या हृदयात दु:खी लोकांच्या प्रती अपार करुणा होती. दोन घटना आमच्या समोर आहेत.

### (१) पटाचारा

हिचा जन्म श्रावस्ती नगराच्या एका महाधनी श्रेष्ठी-परिवारात झाला होता. परिवारात चारच सदस्य होते – शेठ, शेठाणी, एक मुलगा आणि एक मुलगी. हा छोटासा परिवार श्रावस्तीतील एका सात मजली विशाल हवेलीत निवास करीत होता. मुलगी जेव्हा तरूण झाली तेव्हा तिच्या सेवेत एक युवा नोकर ठेवण्यात आला, ज्याच्या कुसंगतीत ती भटकली. तिचा विवाह दुसऱ्याशी होण्यापूर्वीच दोघेही हवेलीत जे काही धन-आभुषण हातात आले त्यांना घेऊन घरातून पळून गेले आणि नगरापासून दूर एका छोट्याश्या गावात पती-पत्नी बनून राहू लागले.

घरातून चोरून आणलेले धन संपेपर्यंत त्याआधारे जगत राहिले. त्यानंतर अत्यंत विपन्नावस्थेत दिवस जात होते. दोन वर्षांनंतर युवती गर्भवती झाली. तिला दोन पुत्र झाले, परंतु संयोगाने दोघेही दुर्घटनेत मृत्यू पावले आणि पती काळ्या नागाच्या चावण्यामुळे. ही दु:खी अभागिनी रडत-रडत एकटीच श्रावस्तीकडे निघाली. श्रावस्तीला पोहोचण्यापूर्वीच स्मशान घाटावरच माहीत झाले की काल रात्री जोरदार वादळी पावसामुळे वडिलांची सात मजली हवेली कोसळली. त्यात तिचा पिता, माता आणि भाऊ तिघेही दबून मरण पावले. आता जगात तिचे आपले कोणीही राहिले नाही. ह्या आघाताने ती वेडी झाली आणि श्रावस्तीच्या रस्त्यांवर व गल्ली-बोळात आपली शुद्ध विसरून निर्वस्त्र भटकू लागली.

अशा दुरावस्थेत आपल्या एका पूर्वसंचित पुण्याच्या संयोगाने एक दिवस ती जेतवन विहाराच्या जवळून जात होती, जेथे भगवान बुद्ध लोकांना धर्म-देशना देत होते. धर्म-वाणी ऐकून ती भगवानांजवळ आली.

भगवानांनी करुणेने भरलेल्या शब्दात म्हटले – "माझ्या दु:खी मुली! आपली शुद्ध सांभाळ!" ह्या वाणीत स्नेह आणि मैत्रीचे अमृत भरले होते. ऐकताच त्या दु:खी मुलीस थोडीशी शुद्ध आली. आपल्या नग्न शरीराकडे लक्ष जाताच लाजेने संकोचून तिथेच बसली. जवळच धर्म ऐकत असणाऱ्या एका भावाने तिच्यावर आपली चादर टाकली. तेव्हापासून त्या अभागिनी दु:खी मुलीचे नाव 'चादर ओढलेली' म्हणजे 'पटाचारा' पडले. तिने भगवानांना शरण मागितली. भगवानांनी आश्वासन दिले – "मुली! धर्म धारण कर. धर्म तुला योग्य शरण देईल."

भगवानांच्या वाणीने शुद्ध धर्म ऐकत-ऐकतच तिचे चित्त एकाग्र झाले आणि आत विपश्यना जागली. पूर्व पारमितांमुळे तिथेच बसल्या-बसल्या ती स्रोतापन्न झाली. भगवानांनी तिला प्रव्रजित करविले. मुक्तिदायिनी विपश्यनेच्या मार्गावर दृढतापूर्वक पुढे जात-जात ती स्रोतापन्नपासून अरहंत अवस्थेपर्यंत जाऊन पोहोचली. आपले मनुष्य जीवन सार्थक केले आणि पूर्णपणे दु:खमुक्त झाली.

### (२) किसा गोतमी

भगवान बुद्धांच्या जीवनकाळातच उत्तर भारताची प्रसिद्ध नगरी श्रावस्तीच्या एका अत्यंत निर्धन परिवारात गोतमीचा जन्म झाला होता. अत्यंत कृशकाय, दुबळी असल्यामुळे लोक तिला "किसा गोतमी" म्हणत होते. तेथीलच एका धनी कुळात तिचा विवाह झाला, परंतु तिला धनी परिवाराचे कोणतेही सुख मिळू शकले नाही. गरीब परिवारातून आलेली असल्यामुळे तिला टोमणे ऐकावे लागत असत आणि वरून संतान नसल्यामुळेही नेहमी मर्मभेदक गोष्टी ऐकाव्या लागत असत.

काही वर्षानंतर तिचे भाग्य बदलले. ती गर्भवती झाली. तिने एका पुत्राला जन्म दिला. परंतु हे पुत्र-सुखही तिच्या भाग्यात नव्हते. दोन-तीन वर्षाचा असतांनाच बालकाचा मृत्यू झाला. हा पुत्रच परिवारात तिच्या आदर-सत्काराचे कारण होते. पुत्राचा मृत्यू तिच्यासाठी असह्य झाला. पुत्र-वियोगाने ती अत्यंत दु:खी झाली. मुलाच्या प्रेताला छातीशी आवळून रडू लागली. जेव्हा लोक मृत मुलाच्या प्रेताला स्मशानात घेऊन जाण्यासाठी निघाले तेव्हा वेड्यासारख्या अवस्थेत लोकांना प्रार्थना करू लागली की एखाद्या चांगल्या वैद्याला बोलवा, जो औषध देऊन माझ्या मुलाला जिवंत करेल. मेलेल्याला जिवंत करण्याचे कोणतेही औषध नसते. लोकांना समजले नाही की ह्या दु:खी स्त्रिला कसा धीर द्यावा? तेव्हा एका दयाळू व्यक्तीने तिला महाकारुणिक, महाभिषक भगवान बुद्धांजवळ जाण्याचा सल्ला दिला, जे त्या वेळी जेतवन विहारात थांबले होते.

किसा गोतमी आपल्या मृत पुत्राला छातीशी आवळून रडत-रडत जेतवन विहारात भगवान बुद्धांजवळ पोहोचली. मुलाच्या प्रेताला त्यांच्या चरणांजवळ ठेऊन त्याला जीवन-प्रदान करण्याची याचना करू लागली.

भगवानांनी तिची बेहाल अवस्था पाहून तिला नगरातील कोणत्याही अशा घरातून एक चुटकीभर मोहरीचे दाणे आणण्यास सांगितले, ज्या घरात कोणी मेले नसेल.

किसा गोतमी आनंदाने नगरातील घरात मोहरीचे दाणे मागायला गेली. परंतु तिला नगरातील एकही घर असे मिळाले नाही ज्यात कोणी मेले नसेल. पूर्ण नगरीतील घरोघरी फिरून-फिरून थकली, तेव्हा तिला शुद्ध आली की मरणे हा प्राण्यांचा धर्म आहे, स्वभाव आहे. ह्या सत्याला समजविण्यासाठीच भगवानांनी मला हे काम सांगितले.

सत्याची शुद्ध येताच प्रेताला अंतिम संस्कारांसाठी देऊन भगवानांच्या शरणात जाण्यासाठी परतली.

भगवानांनी तिला धर्म शिकविला. भिक्षुणीसंघात प्रव्रजित होऊन पूर्वजन्मांच्या विपुल पुण्य-पारमितांमुळे गंभीरतापूर्वक विपश्यनेचा अभ्यास करीत ती स्रोतापन्न झाली आणि शेवटी अरहंत अवस्था प्राप्त केली. तिने अनेक दु:खी महिलांना शुद्ध धर्मयुक्त विपश्यनेचे प्रशिक्षण देऊन दु:खमुक्त केले. भगवानांनी तिला जाड (रुक्ष) चीवर धारण करणाऱ्या स्त्रियात 'अग्र' ची उपाधी दिली.

कल्याणमित्र

सत्यनारायण गोयन्का

---

## भगवान बुद्धांच्या शिकवणुकीच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण

भगवान बुद्धांच्या नंतर सम्राट अशोकाने बुद्धांच्या धर्म-शिकवणुकीला भारताच्या दूर-दूरच्या गावात आणि शेजारील देशातही पसरविले. अशोकाच्या मृत्यूनंतर त्याच्या संतानात राजगादी प्राप्त करण्याच्या इच्छेने परस्परात कलह निर्माण झाला. हळू-हळू राजपरिवाराची सुख-शांती नष्ट होऊ लागली. त्यामुळे सारे साम्राज्य बृहद्रथाच्या हातात आले. बृहद्रथ दुर्बळ वृत्तीचा राजा होता. बाहेरील शत्रुंचे आक्रमण होत राहात असे. त्यामुळे त्याने आपल्या अश्वारोही सेनेच्या सैनिकांना प्रशिक्षित करण्यासाठी कोण्या अन्य देशातून आलेल्या पुष्यमित्र शुंग नावाच्या युवकाला आपल्या अश्वसेनेचा प्रशिक्षक बनविले. हळू-हळू काही कुटिल लोकांच्या चलाखीमुळे तो साऱ्या सेनेचा सेनापती झाला. दुर्भाग्यामुळे ह्याच लोकांनी चलाखीने पुष्यमित्राच्या हाताने राजाची हत्या करविली आणि पुष्यमित्र शुंगला राजगादीवर बसविले, जो सेनेचा सेनापती होता. तो राजमदात मस्त झाला. त्याला दिसतही नव्हते की षडयंत्रकारी त्याच्याद्वारे काय करवित आहेत. त्यानंतर ते आपली मनमानी करू लागले– "पती झाला कोतवाल, आता भिती कोणाची" ह्या म्हणीनुसार कारभार सुरु झाला.

लोकांच्यात खूप मोठी भ्रांती पसरली की पुष्यमित्र शुंगाच्या राज्यात सर्व ब्राम्हण समाजाने मिळून बुद्धांच्या शिकवणुकीला नष्ट करून टाकले. वस्तुतः सामान्य ब्राम्हणांचा बुद्धांच्या शिकवणुकीला कोणताही विरोध नव्हता. विरोध ब्राम्हणांच्या पुरोहित वर्गाच्या मनात जागला, कारण जे पशू-यज्ञ होत होते, ते बुद्धांच्या शिकवणुकीमुळे बंद होत गेले. त्यामुळे त्या यज्ञांमुळे होणारी त्यांची मोठी कमाई बंद झाली. हे सत्य आहे की सर्व पुरोहित ब्राम्हणच होते परंतु सत्य हे ही आहे की सर्व ब्राम्हण पुरोहित नव्हते. यज्ञ बंद झाल्यामुळे सर्वात मोठी हानी पुरोहित वर्गाच्या ब्राम्हणांची झाली. त्यामुळे त्यांनी नवीनच तयार झालेल्या संस्कृत भाषेत जे साहित्य रचले, त्यात बुद्धांच्या शिकवणुकीला लोकांसाठी अग्राह्य आणि चुकीचे सांगितले आणि ह्या प्रकारे बुद्धांची शिकवणुक नष्ट होत गेली.

त्यामुळे सर्व ब्राम्हणांना बुद्धांच्या शिकवणुकीला नष्ट करण्यासाठी जबाबदार ठरविणे एकदम चुकीचे आहे. कारण बुद्धांच्या विद्येला नष्ट करणारे तर मोजकेच पुरोहित होते, जे ब्राम्हण वर्गाचे अवश्य होते, परंतु ब्राम्हणांचा सर्वसाधारण समाज पुरोहितगिरी करीत नव्हता. त्यामुळे बुद्धांच्याद्वारे पशू-यज्ञ बंद करण्यामुळे त्यांचे खूप मोठे नुकसान नव्हते. यज्ञांचा प्रमुख लाभ तर पुरोहितांना प्राप्त होत होता. बाकी इतर ब्राम्हणांना तर केवळ प्रसादाच्या रूपाने बळी दिलेल्या पशूच्या मासाचे काही तुकडे मिळत होते. ह्या यज्ञांच्या बंद होण्यामुळे सर्वात मोठी हानी पुरोहितांची झाली, इतर ब्राम्हण समाजाची नाही. पुरातन साहित्याच्या अवलोकनाने ह्या बाबीचे प्रमाण मिळते की कोणत्या यज्ञाला करविण्यामुळे पुरोहिताला किती दक्षिणा मिळत होती.

**१. अग्निहोत्र यज्ञ –** १००० पेक्षा जास्त गायी आणि चांदीची खोळ चढविलेला पांढरा रथ.

**२. विश्वजित यज्ञ –** आपली सारी संपत्ती अथवा १००० गायी आणि १०० घोडे.

**३. विश्वजित शिल्प यज्ञ –** राजा आणि त्याच्या प्रदेशाच्या सामर्थ्यानुसार जितके तो देऊ शकतो तेवढे द्यावे लागत होते.

**४. स्येन यज्ञ –** कारण की यज्ञाचे स्वरूप जादूटोन्याचे होते म्हणून दक्षिणेच्या रूपाने एक डोळा असणारी, लंगडी, बिना शिंगाची, बिना शेपटीची, आजारी गाय द्यावी लागत होती.

**५. साड्यशक्र यज्ञ –** ६००६ गायी.

**६. वाजपेय यज्ञ –** १७०० गायी, १७०० मुल्यवान कपडे, १७०० मेंढ्या, १७०० बकऱ्या. काही काही जागी १७००० ही म्हटले आहे.

**७. राजसूय यज्ञ –** २४००० गायी.

**८. अश्वमेध यज्ञ –** अगनित गायी आणि राणी व पुत्रीला सुद्धा पुरोहिताला दिले जात होते.

**९. सर्वमेध यज्ञ –** आपला सर्व जमीन-जमुला, आपल्या मालकीची सारी संपत्ती पुरोहिताला दिली जात होती.

सर्वसाधारण ब्राम्हण पुरोहित नव्हते. अनेक ब्राम्हण भिन्न-भिन्न प्रकाराच्या रोजगाराने आपला उदरनिर्वाह करीत होते. उदाहरणार्थः –

**१.** वैद्याचे कार्य, **२.** राज अमात्याचे कार्य, **३.** शिकार करण्याचे कार्य, **४.** मासे पकडण्याचे कार्य, **५.** राजाची सेवा करण्याचे कार्य, **७.** पशुपालनाचे कार्य, **८.** मेहनत-मजुरीचे कार्य, **९.** शेती नांगरण्याचे कार्य, **१०.** तलवारीचे लक्षण सांगण्याचे कार्य इत्यादी.

पुरोहित वर्गातही काही मोजके लोक जे नवीन संस्कृत भाषेचे विद्वान होते, ते बुद्धांद्वारे प्रयुक्त पुष्कळश्या साधनासंबंधी शब्दांचा प्रयोग आपल्या प्रशिक्षणात करू लागले, ज्यामुळे लोकांना ही भ्रांती होवो की त्यांची विद्या तर पुरातन आहे, जिला बुद्धाने त्यांच्या साहित्यातून प्राप्त केले आहे. त्यांनी अशा साहित्याची रचना केली, जे बुद्धांच्या शिकवणुकीच्या विरोधी सिद्ध झाले. बुद्धांच्या शिकवणुकीत आर्य अष्टांगिक मार्ग खूप प्रसिद्ध होता, त्यामुळे त्यांनी अष्टांग योगाची निर्मिती केली. बुद्धांच्या विपश्यनेत डोक्यापासून पायापर्यंत व पायापासून डोक्यापर्यंत आतील सत्याला पाहण्याची क्रिया होती, जिला अनुलोम-प्रतिलोम म्हणत असत. त्यांनी श्वासाच्या येण्या-जाण्याला अनुलोम-प्रतिलोमचे नाव दिले, ज्यामुळे लोकांना भ्रांती होवो की ही अनुलोम-प्रतिलोमची शिकवणुकही खूप पुरातन आहे. ह्याप्रकारे पुरोहित-वर्गाच्या ह्या संस्कृत-साहित्यकारांनी हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की बुद्धांनी ह्या पुरातन विद्येच्या आधारावर आपल्या शिकवणुकीचा विस्तार केला.

पुरोहितांनी समाजात ह्या बाबीचाही प्रबळ प्रचार केला की कृष्ण बुद्धांच्या पूर्वीचे अवतार होते. त्यामुळे त्यांच्या वेळची गीता ही निश्चित रूपाने पुरातन ग्रंथ आहे. जेव्हा की वास्तविकता ही आहे की गीता बुद्धांच्या नंतरची रचना आहे आणि बुद्धांच्या शिकवणुकीवर गीतेचा प्रभाव नाही तर गीतेवर बुद्धांच्या शिकवणुकीचा प्रभाव आहे.

दुसरे त्यांनी पाहिले की बुद्धांच्या शिकवणुकीचा विस्तार ह्यामुळे झाला की ही सांप्रदायिक शिकवण नसून सार्वजनिक शिकवण होती. बुद्धांच्या शिकवणुकीचा आधार शील, समाधी आहे आणि सदाचरणच धर्म आहे. लोक ह्याला सांप्रदायिक मानीत नव्हते. त्यामुळे हिचा प्रसार होण्यात कोणतीही अडचण आली नाही. बुद्धांनी आपल्या शिकवणुकीला 'धर्म' म्हटले, जो सर्वांचा असतो. आपल्या अनुयायांना 'धार्मिक' म्हटले, ह्याला सर्वांनी स्वीकारले. त्यामुळे त्यांनी बुद्धांच्या शिकवणुकीवर गंभीर प्रहार हा केला की त्यांची शिकवण 'धर्म' नसून 'बौद्ध-धर्म' होती आणि त्यांचे अनुयायी 'धार्मिक' नसून 'बौद्ध' होते. ह्या प्रकारे बुद्धांची सार्वजनिक शिकवण सांप्रदायिक बनविण्यात आली

आणि लोक ह्यालाही एक 'सांप्रदायिक-धर्म' मानू लागले. ह्यामुळे बुद्धांच्या शिकवणुकीचा ज्या सहज भावाने विस्तार होत होता, तो थांबला.

संप्रदाय शब्द धर्माच्या रूपात मानण्यात येऊ लागला. त्यामुळे जेव्हा भारताचे संविधान बनले तेव्हा चुकीने त्याला हिंदी भाषेत 'धर्म-निरपेक्ष' म्हटले गेले. कोणतेही चांगले राज्य 'धर्म निरपेक्ष' नसते तर 'धर्म-सापेक्ष' असते. ते 'संप्रदाय-निरपेक्ष' अवश्य असते. इंग्रजीत लिहिल्या गेलेला भारतीय संविधानाचा हिंदी अनुवाद हिंदीचे प्रसिद्ध विद्वान शेठ गोविंददास द्वारे केला गेला आणि त्यांनी हिंदी अनुवादात 'धर्म निरपेक्ष' शब्दाचा प्रयोग केला, जो चुकीचा होता. शेठ गोविंददास जेव्हा रंगूनमध्ये मला भेटले तेव्हा मी त्यांना म्हटले की चांगले राज्य 'धर्म-निरपेक्ष' कसे होईल? राज्य तर 'धर्म-सापेक्ष' असले पाहिजे. हो, 'संप्रदाय-निरपेक्ष' अवश्य आहे. त्यांनी आपली चूक स्वीकारली आणि पुढे चालून 'धर्म-निरपेक्ष' च्या जागी 'पंथ-निरपेक्ष' केले. हिंदीच्या एका अन्य विद्वानांनीही ह्याबाबत आवाजी मागणी केली की 'धर्म-निरपेक्ष' म्हणण्यात येऊ नये आणि 'पंथ-निरपेक्ष' शब्दाचे त्यांनी समर्थनही केले.

साऱ्या देशात आजही 'धर्म' चा अर्थ 'संप्रदाय' च्या रूपाने घेतला जातो, जसे हिंदू-धर्म, जैन-धर्म, इस्लाम-धर्म, शिख-धर्म इत्यादी. 'धर्म' सर्वांना स्वीकार्य आहे आणि बुद्धांची शिकवणुक जोपर्यंत 'धर्म' होती, तेव्हापर्यंत सर्वांना स्वीकार्य होती. परंतु 'बौद्ध-धर्म' बनताच अन्य संप्रदायांप्रमाणेच ती संप्रदाय झाली. ही मान्यता दुर्भाग्याने साऱ्या भारतातच नाही तर शेजारी देशातही पसरली. इंग्रज लोक भारतात आले तेव्हा त्यांनी हिंदुइज्म (Hinduism), जैनिज्म (Jainism) अशा शब्दांप्रमाणेच बुद्धांच्या शिकवणुकीलाही 'बुद्धीज्म्' (Buddhism) म्हणणे सुरु केले आणि त्यांच्या अनुयायांना 'बुद्धिष्ट' (Buddhist) म्हणू लागले. ह्या प्रकारे इंग्रजांनी बुद्धांच्या शिकवणुकीला बुद्धिज्म् घोषित केले आणि त्यांच्या अनुयायांना बुद्धिष्ट. राजाच्या मान्यतेचा प्रभाव प्रजेवर पडू लागला.

जेथे-जेथे त्यांच्या राज्याचा विस्तार झाला, तेथे तेथे बुद्धांची शिकवणुक 'धर्म' न राहून 'बौद्ध धर्म' झाली आणि 'बुद्धिज्म्' म्हणविल्या गेली आणि ह्याला मानणारे 'धार्मिक' नसून 'बौद्ध' झाले. बुद्धांची शिकवणुक सांप्रदायिकता-विहीन होती, सार्वजनिक होती. तिला सांप्रदायिक बनविण्यासाठी अन्य शिकवणुकीप्रमाणेच जेव्हा 'बौद्ध-धर्म' म्हटले जाऊ लागले, तेव्हा बुद्धांच्या शिकवणुकीच्या पतनाचे हे एक मोठे कारण झाले. लोकात ह्या बाबीचा प्रचार होऊ लागला की "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावह"– परधर्मात जाण्यापेक्षा स्वधर्मात मरणे श्रेयस्कर आहे. गीतेचे हे बोल बुद्धांच्या नंतरचे आहेत. परंतु गीतेला बुद्धांपूर्वीची रचना सांगून ह्या पदाला जुने म्हणून प्रसिद्ध करण्यात आले. वस्तुतः ह्याला पुरातन भारतीय संस्कृतीतून घेतले गेले नाही, तर बुद्धांच्या शिकवणुकीला बिघडवून ग्रहण केले गेले.

ज्याला 'धर्म' म्हणतात त्याला सर्व जाती, वर्ण, गोत्र, संप्रदाय अथवा देश-विदेशाचे लोक एकसमानच स्वीकार करतात कारण धर्म सर्वांचा असतो. "सदाचरणच धर्म आहे, दुराचरणच पाप" ह्या बोलात कोणाचेही काहीही मतभेद होत नाहीत. परंतु जेव्हा बुद्धांच्या शिकवणुकीला 'बौद्ध-धर्म' म्हणणे सुरू केले तेव्हा त्यालाही संप्रदायासोबत जोडून लोक हे समजू लागले की हा तर परधर्म आहे, त्यांनी ह्यापासून दूर राहिले पाहिजे. भारतात बुद्धांच्या शिकवणुकीच्या पतनाचे हे एक मोठे कारण झाले.

मी शेजारील देश बर्मा (म्यंमा) मध्ये पाहिले की सर्वसाधारण जनता आपल्या भाषेत बुद्धांच्या धर्माला 'टया' म्हणते, ज्याचा अर्थच 'धर्म' आहे. "टयो ना थौं मै" म्हणजे धर्माचे प्रवचन ऐकू, 'टया टाइं मै" म्हणजे धर्माच्या साधनेत बसू. परंतु सोबतच 'बुद्धीज्म्' आणि 'बुद्धीष्ट' शब्दही बहु-प्रचलित झाले, कारण "जसा राजा. तशी प्रजा." जशी बुद्धांची शिकवणुक सार्वजनिक न राहून सांप्रदायिक झाली तसेच स्वभावतः लोक ह्यापासून दूर पळू लागले.

ह्याचप्रकारे "सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज"– येथेही सर्व धर्मांचा अर्थ सर्व सांप्रदायिक धर्माशी आहे, ज्यात बुद्धांची शिकवणुकही सामील करण्यात आली. हा ही फसवेगिरीचाच प्रयोग होता, जो बुद्धांच्या शत्रूंनी पसरविणे सुरु केले आणि बुद्धांच्या शिकवणुकीचा ह्रास होत गेला.

कल्याणमित्र

सत्यनारायण गोयन्का

---

## मित्र उपक्रम धम्मसेवा

पूज्य गुरुदेवांची दूरदृष्टी ह्या बाबीवर गेली की सर्व शाळेत आनापान लहाणपणापासूनच शिकविले जावे. ह्यासाठी आवश्यक होते की शाळेचे शिक्षकही विपश्यना करीत ज्यामुळे ते मुलांना नियमित अभ्यास करवू शकण्यात सहायक होऊ शकतील. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने आपल्या सर्व शाळेत एक जी. आर. काढून शिक्षकांना विपश्यना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. विपश्यना विशोधन विन्यास आणि महाराष्ट्र सरकारच्या सहयोगाने 'मित्र उपक्रम' ची स्थापना केली गेली आणि ह्याच्या संचालनासाठी अनेक सहायक आचार्य, सरकारी अधिकारी व धर्मसेवकांनी मिळून कामाला वेग दिला. ह्या प्रकारे महाराष्ट्रात आता जवळपास अडीच करोड विद्यार्थ्यांना आनापान शिकविण्यात आले आहे.

मागील वर्षी जवळपास २,८०० शाळा शिक्षकांनी विपश्यनेच्या १० दिवसीय शिबिरात भाग घेतला आणि ह्या वर्षी जवळपास ५०,००० शिक्षक शिबिरात भाग घेणार आहेत. हि शिबिरे केंद्र नसलेल्या ठिकाणी लावली जातील, ज्यांच्या योग्य रीतीने संचालनासाठी खूप मोठ्या संख्येने धर्मसेवकांची आवश्यकता आहे. कृपया धर्मसेवेसाठी आपले नाव खालील फोन नंबरांवर अथवा ईमेलने लिहून पाठवावे.

**मुंबई क्षेत्रात –** सफाले, पनवेल व बिलोमोरासाठी - कु. दीना रवानी – ९८३३६९३३४३. **नाशिक –** शी. साजिद वजीर शेख - ९८२३१५२२५४ अथवा ईमेल- sajid.shaikh@sarda.co.in; **कोल्हापूर –** श्री सुनील चौगुले – ९४२२८५५२५८; **अन्य स्थानांसाठी** – श्री रवीन्द्र खरात - ९९३०२६८८७५

**मुख्य ईमेल-** mitraupkrammumbai@gmail.com,

**online Regn.** http//www.globalpagoda.org/mitra-seva

आवेदन पत्र मिळाल्यावर धर्मसेवकांना त्यांच्यासाठी विशेष कार्यसूची व अन्य विवरण समजविले जातील ज्यामुळे त्यांच्या सेवेचा जास्तीत-जास्त लाभ लोकांना प्राप्त होऊ शकेल आणि खऱ्या अर्थाने **बहुजनहिताय बहुजनसुखाय लोकानुकम्पाय** सेवा होईल. जे आचार्य ह्या शिबिरात सेवा देऊ इच्छित असतील त्यांनी कृपया श्री ऋषिकांत मेहतांशी ०९४०८२८३०१८ वर संपर्क साधावा. धन्यवाद!

---

## दोन दिवसीय निवासी बाल-शिबिर

धम्मवाहिनी, टिटवाला विपश्यना केंद्रावर १२ ते १५ वर्षाच्या मुला/मुलींसाठी दोन दिवसीय निवासी शिबिर आयोजत करण्यात येत आहेत. साधकांनी कृपया खालील तारीख व बुकिंगची वेळ पाहून योग्य वेळी मुला/मुलींसाठी बुकिंग (रजिस्ट्रेशन) अवश्य करावे. १) येत्या २६ व २७ मेला केवळ मुलांसाठी, बुकिंग १५ मे नंतर, २) ह्याच प्रकारे ६ व ७ जूनला, केवळ मुलींसाठी, बुकिंग २५ मेनंतर; संपर्कः फोन नं.- ०२२-२५१६२५०५/ २५०११०९६ वर ऑफिसच्या वेळी संपर्क करावा.

तसेच १७ ते २५ मे केवळ किशोरांसाठी व २८ ते ५ मेंपर्यंत केवळ किशोरींसाठी ८ दिवसीय शिबिर. अन्य अनेक केंद्रावरही किशोर-किशोरींसाठी शिबिर निश्चित केलेली आहेत. कृपया संबधित केंद्रांशी संपर्क साधावा.

---

## निर्माणाधीन विपश्यना केंद्र

हरियाणाच्या रोहतक शहरापासून १० किमी. च्या अंतरावर लाहली गावात विपश्यना केंद्राचे निर्माणकार्य प्रगतीवर आहे. पूज्य गुरुदेवांनी ह्याला **'धम्म हितकारी'** नाव दिले आहे. विपश्यना ध्यान समिति, द्वारा-जनसेवा संस्थान, भिवानी रोड, रोहतकला ८०-जी आयकरची सुट प्राप्त आहे. साधक ह्या पुण्यकार्यात भागीदार बनून दान-पारमीचा लाभ घेऊ शकतात. खालील बँकात सरळ पैसे जमा केल्यावर कृपया विपश्यना ध्यान समितीच्या व्यवस्थापकाला पावतीसाठी अवश्य सूचित करावे

**Andhara Bank** A/c 113410011000218 (IFS Code: ANDB0001134) or **Oriental Bank** A/c. 07952191038955 (IFS Code: ORDC0100795) **Email:** vipassanarohtak@gmail.com; 20583440.

---

## अतिरिक्त उत्तरदायित्व

### वरिष्ठ सहायक आचार्य

1-2. Mr. Jeff & Mrs. Jill Glenn, USA, To assist the Centre T. in serving **Dhamma Kunja**

### सहायक आचार्य

१. श्री कपिलनाथ साहू, रायपुर धम्म उत्कलच्या सेवेत केंद्र आचार्यांची सहायता

### नवे उत्तरदायित्व आचार्य

१-२ श्री चंदुभाई व श्रीमती ज्योत्सना मेहता, .धम्मकोटच्या सेवेत केंद्र आचार्यांची सहायता

### वरिष्ठ सहायक आचार्य

१. श्री अनिल अनोपचंद शाह, भावनगर
२. श्री दीपक मुचरीकर, जलगांव
३. श्री डोंगर जोप, पुणे
4. Ms. Bridget Riley, USA
5. Mr. Charlie Dowley, Australia
6. Mrs. Ming-Chiao Wendy Tai, Taiwan
7. Mr. Leon & Mrs. Yonit Yogev, USA
8. Mrs. Simin Sarmadi Zokaei, Iran

## नव नियुक्ती

### सहायक आचार्य

१. श्री केशव गेडाम, नागपुर
२. श्री राजेश पटेल, राजकोट
३. श्री ताराचंद चौधरी, जयपुर
4. Mr. Robson Almeida, Brazil
5. Ms. Silvia Escorel, Brazil
6-7. Mr. John Parlett & Mrs. Alisha King, USA

### बालशिविर-शिक्षक

१. श्रीमती शांताबेन महावंशी, साबरकांठा (गुजरात)
२. श्री अमृत पटेल, साबरकांठा
३-४. श्री अरविंद व श्रीमती हंसा पंड्या, साबरकांठा
५. श्री रमेश सोनी, साबरकांठा
६. श्री भीकाभाई देसाई, अहमदाबाद
७. श्री विपिनचंद्र देसाई, अहमदाबाद
८. श्रीमती मालिनीबेन दाबके, अहमदाबाद
९. श्री समीर शेलात, अहमदाबाद
10. Ms. Dalene Peacock Cape Town, South Africa
11. Mr Kevan Watkins Worcester, South Africa
12.Mr. Nima Afshar Australia

## बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

२५ मे, २०१३, **शनिवार**, वेळः सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा' च्या** मोठ्या धम्मकक्षा (डोम) मध्ये. कृपया लक्ष द्यावे की ह्या विशाल शिबिरात आपल्याला कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये यासाठी **बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्कः मो.** ०९८९२८५५६९२, ०९८९२८५५९४५ **फोन नं.:** ०२२-२८४५११७०, ३३७४७५४३, ३३७४७५४४, (**फोन बुकिंगः** सकाळी ११ ते ५ पर्यंत, रोज) **ईमेल Registration :** oneday@globalpagoda.org;

### ग्लोबल पगोड्यात (परियत्ति आणि पटिपत्ति) पालि पाठ्यक्रम-२०१३

आवासीय पाठ्यक्रमः-- ९० दिवसीय : पालि-इंग्रजी; अवधी - १-७-१३ ते ३०-९-१३ पर्यंत; आवेदनची तिथी-१५-५-१३ पर्यंत आवेदन पत्र-- www.vridhamma.org ने ही पाठवू शकतात. संपर्कः विपश्यना विशोधन विन्यास (VRI), ग्लोबल विपश्यना पगोडा, एस्सेल वर्ड्च्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१.

### बुद्धशिकवण आणि विपश्यनावर एक वर्षीय पाली डिप्लोमा कोर्स

वी आर आय व मुंबई विश्वविद्यालयाच्या दर्शन-विभागाच्या संयुक्त उपक्रमाअंतर्गत वर्ष १३-१४ मध्ये इंग्रजी माध्यमातून पाली डिप्लोमा कोर्स आयोजित केला गेला आहे, ज्यात भगवान बुद्धांच्या शिकवणुकीतील सिद्धांतीक व व्यावहारिक पक्षांचे निरूपण केले जाईल. स्थळ– ज्ञानेश्वर भवन, दर्शन विभाग, मुंबई विश्वविद्यालय विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व) मुंबई -४०००९८. आवेदन पत्र– वरील ठिकाणी उबलब्ध– १ ते १५ जुलै सोमवार ते शुक्रवार, ११. ३० ते २. ३० वाजेपर्यंत. कोर्स कालावधी– २०/७/१३ ते ३१/३/१४ वेळ– दुपारी २. ३० ते संध्या ६. ३० वाजेपर्यंत, योग्यता– कमीतकमी १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच दिवाळीच्या सुट्टीमध्ये विपश्यना शिबिरात भाग घेणे आवश्यक असेल. अधिक माहितीसाठी संपर्क करा– डॉ शारदा संघवी– फोनः ०२२-२३०९५४१३, मो. ०९२२३४६२८०५, ईमेलः s_sanghvi@hotmail.com; २) श्रीमती बलजीत लाम्बा: फोनः ०९८३३५१८९७९; ३) ३) अलका वेंगुलकरः ०९८२०५८३४४०.

## दोहे धर्माचे

शुद्ध सत्य धर्म आहे, असत्य धर्म नाही।
जिथे वाढते कल्पना, धर्म तिथे न राही॥

सदाचार धर्म आहे, दुराचरण हे पाप।
पर सेवा धर्म आहे, पर पीडन हे पाप॥

आत बाहेर शुद्ध हो, कर स्वच्छ व्यवहार।
सत्य प्रेम करुणा जागे, हाच धर्माचा सार॥

संप्रदाय जातीचा, हा भेद ना राहे।
शुद्ध सनातन धर्मची, वंदनीय आहे॥

धन्य! धन्य! गुरुदेवजी, धन्य! बुद्ध भगवान।
शुद्ध धर्म असाच दिला, होय जगती कल्याण॥

## दोहे धर्माचे

करुणासागर बुद्धजी, तुमचेची उपकार।
धर्म दिला मंगल सुखी, करण्यासी संसार॥

गुण गाऊ मी बुद्धांचे, मुक्त कंठ साभार।
परम धर्म हा वाटला, होय जगी उपकार॥

धर्मच ईश्वर ब्रम्ह, धर्म होय भगवान।
धर्म शरण मंगल करण, धर्म सुखाची खाण॥

हो अनुकंपा धर्माची, करुणेनी भरपूर।
उघडो द्वार मोक्षाचे, होत अडचणी दूर॥

जन जन पीडितच आहे, कसा हा अत्याचार।
धर्म जागला तर जगी, मिटेल पापाचार॥

धरतीवर पुन्हा वाहो, धर्म गंगची धार।
तहान भागे जगाची, करेलच जन उद्धार॥


विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरि, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
**Email:** info@giri.dhamma.org
**Website:** www.vridhamma.org